तीर्थरूप.

आण्णा आणि काकूस...

# ऋणनिर्देश

शिवाजी विद्यापीठाच्या एम. फिल. (मराठी) पदवी परीक्षेसाठी श्री. दा. पानवलकरांची 'सूर्य' कथा आणि 'अर्धसत्य' चित्रपट (चिकित्सक अभ्यास) या विषयावरील लघुप्रबंध सादर करीत असताना मला अत्यंत आनंद होत आहे.

प्रस्तुत लघुप्रबंधाच्या निवडीपासून पूर्ततेपर्यंत वेळोवेळी महत्त्वपूर्ण सूचना देऊन मार्गदर्शन करणाऱ्या आदरणीय मार्गदर्शक प्राचार्या, डॉ. दीपा विवेक देशपांडे यांचे ऋण शब्दात व्यक्त न करता येण्याजोगेच आहे.

शिवाजी विद्यापीठाच्या मराठी विभागाचे विभागप्रमुख डॉ. विश्वनाथ शिंदे, डॉ. रविंद्र ठाकूर, डॉ. कृष्णा किरवले, प्रा. हिमांशू स्मार्त, प्रा. रणधीर शिंदे यांचे मोलाचे सहकार्य लाभले. त्यांचाही ऋणनिर्देश करणे मी उचित समजते.

तसेच नेहमीच अडचणीच्यावेळी आंतरिक जिव्हाळ्याने मदतीचा हात देणारे प्रा. पी. के. पाटील, प्रा. प्रशांत गायकवाड आणि मित्रपरिवार यांच्याशी केलेल्या चर्चेचा लघुप्रबंधास बहुमोल उपयोग झाला.

या संशोधन कार्यासाठी शिवाजी विद्यापीठातील बॅ. खर्डेकर ग्रंथालय, कोल्हापूर, आर्टस् अॅण्ड कॉमर्स कॉलेज आष्टा, करवीर वाचनालय कोल्हापूर, सांगली नगरवाचनालय या ग्रंथालयाचे अनमोल सहकार्य लाभले.

आमच्या घरातील तीर्थरूप आण्णा-काकू, आप्पा, माझे बंधू व बहिणी यांचेही वेळोवेळी प्रोत्साहन, प्रेरणा व आशिर्वाद लाभले. त्यांचीही मी ऋणी आहे.

प्रबंधाचे संगणकावर सुरेख व सुबक अक्षर जुळणी करून देणाऱ्या सौ. राजश्री अमर धनवडे (सायली ग्राफिक्स) यांचेही मी आभार मानते.

**सुरेखा संभाजीराव घारगे**